| | |
|---|---|
| MHAH070001952026 | नियमित जामीन अर्ज क्र.६०/२०२६ आदेश नि.१<br>राजेश्वरी राजु गायकवाड व राजू सयाजी गायकवाड<br>वि.<br>महाराष्ट्र शासन |

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी दिपक कोल्हेचा लहान भाऊ सतिष वय वर्षे ३० सहा महिन्यांपासून कामानिमित्त घरातून गेला होता. सतिष फरशी बसवण्याचे काम करत असल्याने बाहेर राज्यात व काम मिळेल तेथे राहत होता. दि.१६.०३.२०२५ रोजी सकाळी १०.१५ वा. फिर्यादी दिपकला त्याचा चुलत भाऊ बाळासाहेब कोल्हेचा फोन आला व त्याने फिर्यादीस सांगितले की, आठ दिवस सतिषचा फोन बंद होता. अकोले पोलीस ठाणेमध्ये सतिषबाबत जायचे आहे. त्यानंतर ते पोलीसांसोबत मानकर बिल्डींग अकोले येथे गेले. सदर बिल्डींगमधील दुस–या मजल्यावर एका खोलीमध्ये सतिषने सिलींगच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेला दिसला. पिवळया व पांढ–या रंगाच्या दोन चिठ्ठया सतिषने मृत्युपुर्वी लिहिलेल्या मिळून आल्या. त्यामध्ये सतिषने त्याच्या **मृत्युस त्याची पत्नी राजेश्वरी राजू गायकवाड, राजू सयाजी गायकवाड** व विजय जाधव **जबाबदार असल्याचे नमूद केले** होते. **राजेश्वरीने** सतिषचे एक **तोळे सोने, पन्नास हजार रुपये व ओप्पो एफ २३ मोबाईल घेवून गेल्याचे** नमूद होते. सतिष दि.०९.०३.२०२५ रोजी राजेश्वरीचे वडीलांकडे गेला असता त्यांनी राजेश्वरी दोन दिवसात येईल असे सांगितल्याचे नमूद होते. सतिषने दि.११.०३.२०२५ रोजी राजेश्वरीच्या वडीलांना फोन केला असता त्यांनी सतिष यास "तु जर काही केलेस तर तुला व तुझया घरच्यांना किडण्यापिंगच्या केसमध्ये फसवेल" असा दम दिल्याचे चिठ्ठीत नमूद होते. त्यामुळे सदर धमकीला घाबरुन सतिषने गळफास घेऊन आत्महत्या केली. या आशयाची प्रथमखबर दिपक कोल्हेने दि.१७.०३.२०२५ रोजी अकोले पोलीस ठाणेत दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम १०८,

३५१(२), (३) व ३(५) अन्वये गुन्हा रजि. क्र.१४४/२०२५, दि.१७.०३.२०२५ रोजी संध्याकाळी ६.०९ वा. अकोले पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

२. अर्जदार/आरोपींच्या जामीन अर्जातील कथन व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. के. डी. धुमाळ यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी निर्दोष असून त्यांचा सतिषच्या मृत्युशी कोणताही संबंध नाही. अर्जदार/आरोपींनी सतिषला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले नाही. अर्जदार/आरोपींना त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा गुन्हा दाखल केला. गुन्हयास बी.एन.एस. कलम १०८ चे तरतुदी लागू होत नाही तसेच बी.एन.एस कलम ४५ (IPC 107) मधील तरतुदी लागू होत नाही. सतिष व अर्जदार राजेश्वरी यांचेमध्ये कधीही पती-पत्नी म्हणून कोणतेही नाते नाही. त्यामुळे अर्जदार/आरोपी क्र.१ ने पत्नी म्हणून सतिष यास आत्महत्तेस प्रवृत्त केले असे घडले नाही. अर्जदार /आरोपी क्र.१ व २ हे पती पत्नी असून त्यांना दोन मुले आहेत. फिर्यादी पक्ष ज्या तथाकथीत चिठ्ठीवर अवलंबून राहून आरोप करत आहेत ती चिठ्ठी सतिषची नाही. अर्जदार/आरोपींना अडकविण्यासाठी बनावट चिठ्ठी तयार केल्याची शक्यता नाकारता येत नाही. वादाकरीता सदर चिठ्ठी सतिषने लिहीली असे गृहीत धरले तरी त्या चिठ्ठीच्या मजकुरावरुन अर्जदार/आरोपींनी सतिष यास आत्महत्तेस प्रवृत्त केले असा अर्थ होत नाही. सतिष हा त्याचे जिवनास कंटाळला होता. तो आयुष्यात निराश झाला होता. त्यामुळे त्या नैराश्यातून त्याने आत्महत्ता केल्याची शक्यता नाकारता येत नाही. सतिषने आत्महत्ता करणे हे त्याचे वैयक्तीक कृत्य (Independent act) आहे. त्यास केवळ अर्जदार/आरोपी जबाबदार आहेत असे म्हणणे म्हणजे आत्महत्तेस प्रवृत्त करणे असा अर्थ होत नाही.

३. जामीन अर्जात पुढे असे नमूद आहे की, अर्जदार/आरोपी क्र.१ महिला असून तिला दोन लहान मुले आहेत. अर्जदार/आरोपीं विरुद्धचा तपास पूर्ण झाला असून अर्जदार/आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. अर्जदार/आरोपी प्रतिष्ठीत कुटुंबातील

आहेत. त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. अर्जदार/आरोपी पोलिसांना तपासामध्ये सहकार्य करतील. अर्जदार/आरोपी मुळचे राजमाची खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे येथील रहीवासी असून त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. त्यामुळे ते परागंदा होणार नाहीत. गुन्हयाशी संबंधीत साक्षीदारांवर अर्जदार/आरोपी दबाव आणणार नाहीत अथवा पुराव्यात हस्तक्षेप करणार नाहीत. न्यायालयाचे अटींचे व शर्तींचे पालन करतील.

४. सुविद्य विधीज्ञ श्री. के. डी. धुमाळ यांचा पुढे युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपींचा गुन्हयाच्या मागे कोणताही हेतू नाही. त्यांचा गुन्हयात कोणताही सहभाग नाही. त्यांनी पिडीतला आत्महत्येस प्रवृत्त केले नाही. त्यांच्याकडून कोणतीही जप्ती करणे नाही.

५. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. बी. जी. कोल्हे यांचे म्हणणे नि.५ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, अर्जदर/आरोपी क्र.१ चे वडील आरोपी क्र.३ ने मयतास त्याचे नातेवाईकांसह खोट्या गुन्ह्यात फसविण्याची धमकी दिली असून त्याचा मयतास मानसिक त्रास झाल्याने त्याने आत्महत्या केली असल्याचे मृत्युपुर्वी चिठ्ठीमध्ये नमूद असून आरोपींचा गुन्ह्यात सहभाग आहे. मयताचा मोबाईल, रोख रक्कम तसेच एक तोळा दागीने आरोपींनी संगनमताने मयताकडून काढून घेतले असून ते गुन्हयाचे तपासामध्ये जप्त करणे आहे. अर्जदार/आरोपी क्र.१ व २ यांस जामीन मंजुर झाल्यास गुन्ह्यातील पुरावा नष्ट होण्याची शक्यता आहे. त्यांना कायद्याचा धाक राहाणार नाही व न्यायालयात तारखांना हजर राहाणार नाहीत. अर्जदार/आरोपींचा जामीन अर्ज मंजुर झाल्यास ते फिर्यादी व साक्षीदारांना धमकविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६. विवाद्य कथने, अभियोग पक्षाने दाखल केलेली तपासाची कागदपत्रे व युक्तीवाद साकल्याने विचारात घेतला. अर्जदार/आरोपी क्र.२ ला दि.३१.०१.२०२६

रोजी अटक केली. त्यास दि.०२.०२.२०२६ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. त्यानंतर अर्जदार/आरोपी क्र.२ न्यायालयीन कोठडीत आहे. अर्जदार/आरोपी क्र.१ राजेश्वरीस दि.०३.०२.२०२६ रोजी अटक केली. तिस दि.०६.०२.२०२६ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. त्यानंतर ती न्यायालयीन कोठडीत आहे.

७. दि.१७/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर दि.३१/०१/२०२६ पावेतो म्हणजे १० महिने १४ दिवस अर्जदार/आरोपी क्र.२ परागंदा होता व अर्जदार/आरोपी क्र.१ दि.०३/०२/२०२६ पर्यंत म्हणजे १० महिने १७ दिवस परागंदा होती. इतका प्रदीर्घ कालावधीत त्यांनी स्वतःला अटकेपासून सुरक्षित अंतरावर ठेवले. गुन्हा रजि. क्र.१४४/२०२५ चा तपास अद्याप पुर्ण झालेला नाही. तपास प्रलंबीत असे पावेतो उपरोक्त वर्तनाचे अर्जदार/ आरोपी क्र.१ व २ हे जामीनावर मुक्त केल्यास ते निश्चितच तपास प्रभावित करतील. साक्षीदार, फिर्यादी यांचेवर दबाव, प्रलोभन, धाकदपटशा इत्यादींचा वापर करतील अथवा परागंदा होतील. त्याचा विपरीत परिणाम गुन्हा रजि. क्र.१४४/२०२५ चे तपासावर होईल. त्यामुळे अर्जदार/आरोपी क्र.१ व २ हे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८३ अन्वये जामीनास पात्र नाहीत.

## <u>आदेश</u>

नियमित जामीन अर्ज क्र.६०/२०२६ अमान्य केला आहे.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2026.03.09 16:55:42 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक – ०९/०३/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

संगमनेर.